# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,
पनवेल -४१०२०६.

दुरध्वनी कार्यालय : ०२२ – २७४५८०४०/४१/४२
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com

फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/२७७०/सन २०२३-२४ दिनांक:-२९/१२/२०२३

## पदभरती बाबत सुचना

**पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान पदभरती अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक, अनुभव व इतर मूळ कागदपत्र तपासणी वेळापत्रक**

दिनांक २०.१०.२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, अंतर्गत कंत्राटी पदांकरीता प्राप्त अर्ज व कागदपत्राच्या छाननी अंती व जाहिरात मधील शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या निकषानुसार खालील पदनिहाय नमूद उमेदवारांची अंतीम पात्र व अपात्र यादी दिनांक १.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती, त्याअनुषंगाने, जाहिरातीतील नमूद कंत्राटी पदांची अंतीम निवड यादी दिनांक २९.१२.२०२३ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार निवड यादी (Selected) मधील उमेदवारांची मुळ प्रमाणपत्र पडताळणी करीता दिनांक ०२ जानेवारी २०२३ रोजी खालील तक्त्यांत दिलेल्या तपशिलानुसार पदनिहाय व दिनांकानुसार कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० वाजता पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -४१०२०६ येथे उपस्थित राहून मुळ कागदपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी, तरी, निवड झालेल्या उमेदवारांनी शैक्षणिक व अनुभवाच्या मुळ प्रमाणपत्रासह व आपल्या कागदपत्रांच्या एक संच स्वसांक्षाकित (Self Attested) करुन कागदपत्र पडताळणीस उपस्थित रहावे, यासाठी लागणारा प्रवास खर्च वा इतर कोणतेही भत्ते उमेदवारास देय राहणार नाही. मुळ कागदपत्र पडताळणीस अनुपस्थित उमेदवारांची कोणत्याही प्रकारची सबब / तक्रार एकूण घेतली जाणार नाही, तसेच सदर पदांकरीता जाहिरातीत नमूद आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव तसेच मुळ कागदपत्र पडताळणी दरम्यान अर्जामधील माहिती व उमेदवारांनी प्रत्यक्ष सादर केलेली माहिती या मध्ये तफावत / विसंगती आढळल्यास आपणास सदर पदावरील नियुक्ती / उमेदवारीदेण्यात येणार नाही, अथवा कोणत्याही क्षणी नियुक्ती रदद करण्यात येईल याची उमेदवारांनी गांभिर्याने नोंद घ्यावी. वेळापत्रक खालील प्रमाणे...

**पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान पदभरती अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक, अनुभव व इतर प्रमाणपत्रे तपासणी वेळापत्रक**

| अनु. क्र. | पदाचे नाव | कागदपत्र तपासणी दिनांक | वेळ, ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य सेविका | दिनांक ०२.०१.२०२४ | सकाळी १०.३० ते १.३० पर्यंत |
| २ | स्टाफ नर्स (स्त्री) | दिनांक ०२.०१.२०२४ | दुपारी २.३० ते ५.३० पर्यंत |
| ३ | स्टाफ नर्स (पुरूष) | दिनांक ०२.०१.२०२४ | दुपारी २.३० ते ५.३० पर्यंत |
| ४ | LHV | दिनांक ०२.०१.२०२४ | दुपारी २.३० ते ५.३० पर्यंत |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | दिनांक ०२.०१.२०२४ | दुपारी २.३० ते ५.३० पर्यंत |

(डॉ.आनंद गोसावी)
वैदयकीय आरोग्य अधिकारी
पनवेल महानगरपालिका

(सचिन पवार)
उपायुक्त (आरोग्य)
पनवेल महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner